# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| Office : 02382-250634<br>Fax :- 02382-251866<br>E-mail:- celatur@mahadiscom.in | महावितरण | Office of the Exe. Engr. CGRF<br>Latur Zone, Vidyut Bhavan, Ground floor, Old power house, Sale galli,<br>Latur – 413512 |
| EE/CGRF/LTR/30 | | Date :- 26.03.2019 |

**ग्राहक तक्रार क्र.** : १२/२०१८
**तक्रार दाखल दिनांक** : २७.०६.२०१८

**प्रति,**

१. **श्री. किर्ती कन्स्ट्रकशन कं,**
**केशव निवास, अग्रोया नगर,**
**जुना MIDC रोड, लातूर**

२. **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
उप-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं.मर्या. उपविभाग, निलंगा.

**विषय :-** तक्रार अर्ज क्र. १२/२०१८ प्रकरणी निकाल

वरील विषयास अनुसरुन श्री. किर्ती कन्स्ट्रकशन, यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे सुनावणी घेवून तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. सदरील प्रकरणी निकालाची छायांकीत प्रत सोबत आपल्या माहितीस्तव जोडलेली आहे.

**कार्यकारी अभियंता**
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत
ग्राहक तक्रार निवारण मंच, लातूर

**सोबत :** वरीलप्रमाणे

**प्रतिलिपी सविनय सादर :-**
१ मुख्य अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, परिमंडल कार्यालय, लातूर

**प्रतिलिपी :-**
१ कार्यकारी अभियंता (प्र), म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, लातूर
२ कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय, निलंगा

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय लातूर

**ग्राहक तक्रार क्रमांक** : १२/२०१८

**ग्राहक तक्रार दाखल दिनांक** : २७.०६.२०१८

**श्री. किर्ती कन्स्ट्रकशन कं,**
**केशव निवास, अग्रोया नगर,**
**जुना MIDC रोड, लातूर.** **--ग्राहक अर्जदार**

**-- विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**उप-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं. मर्या. उपविभाग, निलंगा.** **-- गैरअर्जदार**

| **कोरम :** | **श्री. पंडितराव बी. मोरे** | **अध्यक्ष** |
|---|---|---|
| | **श्री. सुधीर भाऊराव देशमुख** | **सदस्य** |
| | **श्री. एम. एस. मिसाळ** | **सचिव** |

**निकाल** **दि.२६.०३.२०१९**

ग्राहक अर्जदार, श्री. किर्ती कन्स्ट्रकशन कं. केशव निवास, अग्रोया नगर, जुना MIDC रोड, लातूर, ग्राहक क्र. ६१४९२०००३०७७ - ६१४९२०००३०६९ यांनी त्यांची तक्रार 'अ' फॉर्ममध्ये दि. २७.०६.२०१८ रोजी मंचामध्ये दाखल केली आहे व त्यांचे गाऱ्हाणे खालीलप्रमाणे आहे.

२) ग्राहक अर्जदार यानी आपली बाजु मांडताना असे सांगितले की, त्यांना विज पुरवठा घेण्यासाठी NON DDF/CCRF Estimate प्रमाणे गैर अर्जदार महावितरण तर्फे मंजुरी देण्यात आली होती. दिलेल्या मंजुरी प्रमाणे "रवियोग इन्फ्रॉ-स्ट्रकचर" मार्फत विजवाहिनी उभारली. दि. ०४.०५.२०१३ रोजी कनेक्शन देऊन विद्युत पुरवठा सुरु केला. त्याप्रमाणे दोन महिन्यानंतर विद्युत बील देण्यात आले. ते त्यांनी भरले. जुलै-२०१३ पासुन लो व्होल्टेजमुळे त्यांचे विद्युत पुरवठ्या अभावी क्रषर व बॅचिंग प्लॅंट्स चालली नाहीत. त्यामुळे त्यांचे काम थांबले त्याची जाणीव त्यांनी दि. ०३.१२.२०१४ रोजी संबधीत अधिकारी उपविभागीय, अधिक्षक अभियंता यांना व्होल्टेज लो असल्यामुळे नुकसान होत असल्याची तोंडी माहिती दिली. तसेच त्यांचे काम हे शासनाचे होते वेळेत करणे बंधन कारक होते, ते त्यांनी पुर्ण करण्यासाठी "अशोक रिलॅंड पावर" कंपनीचे १२५ KVA चे दोन जेनरेटर खरेदी

केले ते काम मुदतीस पुर्ण करुन घ्यावे लागले. त्यामुळे त्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले. त्यांबद्दलची तक्रार त्यांनी अंतग्रत ग्राहक तक्रार निवारण कक्ष कडे केली होती त्यात त्यांना सुरक्षा ठेव परत करण्याच्या मागणी मंजुर केली. DDF/CCRF Estimate परताव्याची मागणी अधिकार कक्षेत नसल्यामुळे तसेच परताव्याची मागणीपण फेटाळली.

३) गैर अर्जदारच्या वतीने दि. २६.११.२०१८ रोजी तक्रारी विषयी निवेदन करत असताना हे मान्य केले की, किर्ती कन्स्ट्रकशनला गट नं. २१६ होसुर येथे दोन वेगवेगळे विज जोडणी नमुद ग्राहक नं. अन्वये वितरण कंपनीने इन्फ्रॉ-स्ट्रकचर उपलब्ध नसल्या कारणाने विज जोडणीकरीता NON-DDF/ (CCRF) या योजने अतंर्गत स्वखर्चाने काम करण्यासाठीचे अंदाज पत्रके मंजूर करुन घेतली व दि. १८.०५.२०१२ रोजी १) SE/LTR/TS/Non DDF (CCRF)/२०१२-१३/०५,२) SE/LTR/TS/Non DDF (CCRF)/२०१२-१३/०६, मंजुर अंदाज पत्रकांनुसार ग्राहकाने मे. रवियोग इन्फ्रा-स्ट्रक्चर, लातूर या कंपनीकडून ११ केव्ही व लघूदाब वाहिनेचे साहित्य खरेदीचे बिले छायांकित प्रति मध्ये सादर केलेली आहे. तसेच १०० केव्हीए व ६३ केव्हीए क्षमतेचे दोन रोहित्र खरेदी मे. श्री. स्वामी समर्थ इलेक्ट्रीकल इंडस्ट्रीज गट क्र. १९१ सोलापूर यांचेकडून केल्याचे बिल छायांकित प्रत सादर केलेली आहे. कंपनी नियमाप्रमाणे सदर काम विद्युत परवाना धारक कंत्राट धारकामार्फत करणे अनिवार्य आहे. काम पूर्ण झाल्यानंतर काम पूर्ण झाल्याचा अहवाल महावितरण कंपनीस सादर करणे बंधन कारक आहे. तसेच सदर कामासाठी झालेला खर्च व त्यांची मुळ देयके कामपूर्ण अहवालासोबत सादर करणे आवश्यक आहे. ती ग्राहकाने सादर केल्याचे आढळून येत नाही. रोहित्र चाचणी अहवाल व विद्युत निरक्षक यांचे परवाना देखील सादर केलला आढळून येत नाही.

४) विज जोडणी देत असताना ग्राहक व महावितरण कंपनी यांच्यामध्ये विज वापराकरीता निश्चीत कार्यकाळाचा करार असतो तो औद्योगिक ग्राहकाकरीता किती वर्षाचा आहे. हे समजून येत नाही. तसेच विज जोडणी घेतल्यानंतर विद्युत जोडणी वापरात असे पर्यंत झालेला खर्च हा त्यांच्या चालू बिलातून ५०% वजावट करुन वळती करण्यात येतो. सदर दोन्ही ग्राहकांनी दि. ०१.०७.२०१५ च्या पत्रानुसार स्वेइच्छेने विज जोडणी /पूरवठा कामस्वरूपी खंडीत करण्याची विनंती केली असल्या कारणाने दोन्ही ग्राहक हे दि. ०५.११.२०१५ रोजी कामस्वरूपी खंडीत करण्यात आलेली आहेत. सद्य परिस्थितीत सदर ग्राहकाने उभी केलेले रोहित्र व विज वाहिन्या या उपयोगात नाहीत. ग्राहकाचे हे कायमस्वरूपी विज पूरवठा खंडीत झाल्याने त्यांचे विज बील बंद आहे. त्यामुळे कंपनी परिपत्रकानूसार उर्वरित रक्कम परतावा करणे बंधन कारक नाही. सबब सदरील ग्राहकाचा अर्ज रद्द करण्यात यावा असे निवेदन केले.

५) गैरअर्जदारातर्फे डि. व्ही. मिसाळ, उपकार्यकारी अभियंता, उपविभाग, निलंगा यांनी आपली बाजू मांडताना त्या प्रकरणातील कागद पत्रे मिळाली नाहीत आणि १३.११.२०१८ रोजी ती कागदपत्र मिळाली त्याकागद्र पत्राचा अभ्यास करून दि. २७.११.२०१८ ला अगोदरचा खुलासा देऊन बांजू मांडण्यासाठी तहकूब करण्याची विनंती केली.

६) उभय पक्षाचे म्हणणे व युक्तीवाद वाचले व ऐकले त्यांनतर फॉर्म 'अ' वर असा आदेश केला की, अर्जदाराने व गैर अर्जदाराने परताव्याच्या रकमेसंबंधी व निर्विवाद WCR आणि उपरोलिखीत परतावा रक्कम बद्दल वास्तविक रक्कम जी ग्राहकाने दिली ती गैर अर्जदाराने मान्य केली हा मंहत्वाचा ठरतो. म्हणून सात दिवसाच्या आत उभयंता मधील वाद न्याय मार्गाने सोडवण्यासाठी सादर करावीं असा आदेश दि. ११.१२.२०१८ रोजी पारित करून उभय पक्षाना तो निदर्शनास आनुन दिला. अशी उभयपक्षांची सुचना मिळाल्याच्या सह्या घेतल्या आज तारखे पर्यत म्हणजेच ०२.०१.२०१९ उभयपक्षानी पूर्तता केली नाही.

७) दि. १४.०१.२०१९ रोजी श्री. के.डी. पाटील व महावितरण तर्फे श्री. आर एस. रेड्डी हे हजर होते तसेच सहाय्यक लेखापाल हे पण हजर होते. त्यांच्या तर्फे NON DDF रक्कम परताव्यावर दोन्ही ग्राहक क्र.

६१४९२०००३०७७ - ६१४९२०००३०६९ चे Statement सादर केले. त्यांनी त्याप्रमाणे अर्जदार प्रतिनिधी यांना Statement समजावुन सांगितले. तसेच काही बिलावर प्रत्यक्ष NON DDF रक्कम वजावट परतावा झालेले दाखवुन दिले. पण अर्जदाराच्या प्रतिनिधीने स्वतः अर्जदार हजर नसल्यामुळे संगनक प्रणाली मधुन NON DDF Statement अर्जदारास दाखवण्यासाठी घेतले.

८) ग्राहक क्र. ६१४९२०००३०७७ NON DDF रक्कम मासिक बिलामधुन रु. ६३८०८/- येवढी देण्यात आली असुन शिल्लक रक्कम रु. १९१४३२/- व ग्राहक क्र. ६१४९२०००३०६९ NON DDF रक्कम मासिक बिलामधुन रु. ८९,८६१/- एवढी देण्यात आली व शिल्लक रु. १,७१,७८४/- देणे राहिले आहे. असा युक्तीवाद केला.

९) उभयतांची तक्रार व खुलासा, युक्तीवाद दाखल केलेले Statement व न दाखल केलेल्या कागजपत्राचा विचार करुन मंचाने सर्व प्रथम IGRC, लातूर यांनी दिलेला निकाल अवलोकनास घेतला असता फॉर्म 'अ' सोबत तो जोडलेला दिसुन येत नाही. अर्जदाराकडून त्याची प्रत पाहिली असता असे आढळून येते की, अर्जदाराने दि. २६.०२.२०१८ रोजी अर्ज केला असे संदर्भात नमुद केलेले आहे. 'क्ष' फॉर्मची प्रत या प्रकरणात दाखल केलेले आढळून येत नाही. निकालाच्या प्रति नुसार तो निकाल दि. १९.०६.२०१८ रोजी जाहिर केल्याचे दिसते. IGRC यांनी असा निर्णय दिला की, अर्जदाराचे दोन्ही कनेक्शन संध्या बंद असल्यामुळे वरील पत्रांनुसार NON DDF च्या रकमेची आपणास (ती रक्कम पुर्णपणे परत होई पर्यंत) बीलातून मिळू शकणारी ५०% वजावट ही NON DDF परतावा रक्कम अशी वेगळी देण्यासंबंधी आपल्याला अर्जाप्रमाणे कार्यवाही करता येत नाही.

## निष्कर्ष

तक्रारदार ग्राहक मे.किर्ती कन्स्ट्रकशनला गट नं. २१६ होसुर येथे दोन वेगवेगळे विज जोडणी ग्राहक क्र. ६१४९२०००३०७७ व ग्राहक क्र. ६१४९२०००३०६९ अन्वये वितरण कंपनीने इन्फ्रॉ-स्ट्रकचर उपलब्ध नसल्या कारणाने विज जोडणीकरीता DDF (CCRF) या योजने अतंर्गत स्वखर्चाने काम करण्यासाठीचे अंदाज पत्रके १) SE/LTR/TS/Non DDF (CCRF)/२०१२-१३/०५,२) SE/LTR/TS/Non DDF (CCRF)/२०१२-१३ दि. १८.०५.२०१२ रोजी मंजूर केलेले आहेत. सदर मंजुर अंदाज पत्रकानुसार ग्राहकाने "मे. रवियोग इन्फ्रास्ट्रक्चर, लातूर" या कंपनीकडून ११ केव्ही व लघूदाब वाहिनेचे काम पुर्ण केले. सदर कामासाठी लागणारे साहित्य खरेदीचे बिले छायांकित प्रति मध्ये ग्राहक अर्जदार यांनी सादर केलेली आहेत. तसेच १०० केव्हीए व ६३ केव्हीए क्षमतेचे दोन रोहित्र खरेदी मे. श्री. स्वामी समर्थ इलेक्ट्रीकल इंडस्ट्रीज गट क्र. १९१ सोलापूर यांचेकडून केल्याचे बिल छायांकित प्रत सादर केलेली आहे. तसेच ग्राहक अर्जदाराने महावितरणच्या नियमाप्रमाणे विद्युत निरक्षकांची परवानगी, कार्यपूर्ती अहवाल (WCR) इत्यादीची पूर्तता केलेली दिसुन येते. अर्जदाराने व गैर अर्जदाराने परताव्याच्या रकमेसंबंधी व निर्विवाद WCR आणि उपरोलिखीत परतावा रक्कम बद्दल वास्तविक रक्कम जी ग्राहकाने दिली ती गैर अर्जदाराने मान्य केली हा महत्वाचा ठरतो. त्यांच्या तर्फे NON DDF रक्कम परताव्यावर दोन्ही ग्राहक क्र. ६१४९२०००३०७७ - ६१४९२०००३०६९ चे Statement सादर केले. त्यांनी त्याप्रमाणे अर्जदार प्रतिनिधी यांना Statement समजावुन सांगितले. तसेच काही बिलावर प्रत्यक्ष NON DDF रक्कम वजावट परतावा झालेले दाखवुन दिले. गैर अर्जदार, उपकार्याकारी अभियंता, निलंगा यांनी सादर केलेल्या Statement नुसार, ग्राहक क्र. ६१४९२०००३०७७ NON DDF रक्कम मासिक बिलामधुन रु. ६३८०८/- (रु. त्रेसष्ठ हजार आठशे आठ फक्त) येवढी देण्यात आली असुन शिल्लक रक्कम रु. १,९१,४३२/- (रु. एक लाख एक्क्यानव हजार चारशे बत्तीस फक्त ) व ग्राहक क्र. ६१४९२०००३०६९ NON-DDF रक्कम मासिक बिलामधुन रु. ८९,८६१/- (रु. एक्कोन नव्वद हजार आठशे एकसष्ठ फक्त) एवढी देण्यात आली व शिल्लक रु.

१,७१,७८४/- (रु. एक लाख एक्काहत्तर हजार सातशे चौऱ्याऐंशी फक्त) देणे राहिले आहे. सदर Statement हे गैर अर्जदार यांचे कार्यालयाने लेखा परिक्षण केलेले असून त्यावर कार्यकारी अभियता, निलंगा यांची स्वाक्षरी केलेली दिसुन येते. सदर Statement संदर्भात अर्जदार ग्राहक व गैरअर्जदार यांनी मान्य केलेले आहे. त्यामुळे ग्राहक क्र. ६१४९२०००३०७७ ची शिल्लक रक्कम रु. १,९१,४३२/- (रु. एक लाख एक्क्यानव हजार चारशे बत्तीस फक्त ) व ग्राहक क्र. ६१४९२०००३०६९ ची शिल्लक रक्कम रु. १,७१,७८४/- (रु. एक लाख एक्काहत्तर हजार सातशे चौऱ्याऐंशी फक्त) महावितरणने परतावा करणे क्रमप्राप्त ठरते. सदर रकमेवर ग्राहक अर्जदाराने व्याजाची मागणी केलेली नाही. त्यामुळे सदर रकमेवरील व्याज देण्याचा प्रश्न उद्भत नाही. तसेच नुकसान भरपाई विषयी ग्राहक अर्जदाराने 'अ' फॉर्म मध्ये मागणी केलेली दिसुन येत नाही.

## **आदेश**

१) अर्जदाराचा अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.
२) गैरअर्जदाराने ग्राहक अर्जदारास (ग्राहक क्र. ६१४९२०००३०७७) शिल्लक परतावा रु. १,९१,४३२/- (रु. एक लाख एक्क्यानव हजार चारशे बत्तीस फक्त ) अदा करावा.
३) गैरअर्जदाराने ग्राहक अर्जदारास (ग्राहक क्र. ६१४९२०००३०६९) चा शिल्लक परतावा रु. १,७१,७८४/- (रु. एक लाख एक्काहत्तर हजार सातशे चौऱ्याऐंशी फक्त) अदा करावा.
४) सदर आदेशाचे पालन करुन कार्यपूर्ती अहवाल ३० दिवसाच्या आत ग्राहक मंचास सादर करावा.

ग्राहक अर्जदारास मंचाचा निर्णय मान्य नसेल तर ग्राहक अर्जदार मंचाच्या निकालापासून ६० दिवसाच्या आत ब फॉर्म मध्ये आपले आवेदन खालील पत्त्यावर मा. विद्युत लोकपाल यांचे कडे सादर करु शकतात. फॉर्म ब या कार्यालयात कार्यालयीन वेळेत विनामूल्य मिळेल. मा. विद्युत लोकपाल यांचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

मा.विद्युत लोकपाल

महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग,

प्लॉट नं. १२ श्रीकष्ण विजय नगर छावणी,

नागपूर-४४००१३.

दुरध्वनी क्र.०७१२-२०२२१९८

ठिकाण : - लातूर

दिनांक :- २६.०३.२०१९

| | | |
|---|---|---|
| 26.3.19 | 26-3-19 | 26/3/19 |
| अध्यक्ष | सदस्य | कार्यकारी अभियंता/सचिव |
| ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर |
| दिनांक :- २६.०३.२०१९ | दिनांक :- २६.०३.२०१९ | दिनांक :- २६.०३.२०१९ |